# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर

सेक्टर २७, मिहान पुनर्वसन वसाहत, खापरी, नागपूर-४४१ १०८ (महाराष्ट्र राज्य)

☎ दुरध्वनी क्र. : (०७१०३) २८२०१२ ❖ e-mail: principal.gcoen@gmail.com

Website: www.gcoen.ac.in


क्र. शाअमना / आस्था / २०१८ / 2945

दिनांक 3 0 NOV 2018

## निविदा

शासकीय अभि. महाविद्यालय, नागपूर करीता विद्यार्थी व विद्यार्थिनी वसहतीगृहाकरीता खानावळ व उपहारगृहाची सेवा पुरवण्यासाठी (वसतिगृहाकरीता खानावळ/उपहारगृह चालविणे) निविदा, नोंदणी पात्र खानावळ सेवा कंत्राटदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे.

कोरी निविदा व चालान प्रत या संस्थेच्या www.gcoen.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. निविदा शुल्क रुपये १,०००/– IDBI बँकेतील कोणत्याही शाखेत चालानद्वारे भरण्यात यावे. निविदा शुल्काची रक्कम रोखीने अथवा धनाकर्षाने स्विकारली जाणार नाही. निविदा भरतांना सोबत दिलेल्या अटी व शर्तीचे पालन होणे आवश्यक आहे. सर्व निविदा, निविदाधारकासाठी असलेल्या अटी व शर्ती मधील अ.क्र. १८ ते २१ मध्ये नमुद केलेल्या पध्दतीप्रमाणे सादर करण्यात याव्यात. निविदाधारकास निविदा सादर करण्यास काही शंका असल्यास त्यांचे निराकरण निविदापूर्व बैठकीत करण्यात येईल.

पुर्णपणे भरलेली सिलबंद निविदा महाविद्यालयाच्या कार्यालयात सादर करण्याचा अंतिम दिनांक १७ डिसेंबर, २०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील. निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र | कार्य विवरण | दिनांक |
|---|---|---|
| ०१ | निविदा सुचना प्रकाशन | ३०.११.२०१८ |
| ०२ | निविदा पुर्व बैठक (ईच्छुक निविदाधारका करीता) | १४.१२.२०१८ (सकाळी ११.०० वाजता) |
| ०३ | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | १७.१२.२०१८ (सायं ५.०० वाजेपर्यंत) |
| ०४ | निविदा (मुख्य लिफाफा/तांत्रिक लिफाफा) उघडण्याचा दिनांक | १९.१२.२०१८ (दुपारी १०.३० वाजता) |
| ०५ | अपात्र निविदा धारकाची नावे प्रकाशीत करणे. | १९.१२.२०१८ सांयकाळी ३.०० वाजता |
| ०६ | अपात्र निविदाधारकाचे पात्रतेबाबत अपील व अर्ज | २०.१२.२०१८ दुपारी ११.०० वाजेपर्यंत |
| ०७ | अंतिम पात्र निविदाधारकांच्या नावाचे प्रकाशन | २०.१२.२०१८ दुपारी ३.०० वाजता |
| ०८ | वाणिज्यिक निविदा उघडणे | २०.१२.२०१८ सांयकाळी ३.३० वाजता |

निविदेसोबत योग्य ती सर्व कागदपत्रे व जोडपत्रे न जोडल्यास निविदा रद्द करण्यात येईल. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा हक्क राखून ठेवण्यात येत आहे.

(डॉ. एम. पी. कुमरेकर)
प्र. प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
नागपूर

# निविदाकारासाठी अटी व शर्ती

१. या संस्थेतील विद्यार्थ्यांना खानावळ व सोबतच त्याच इमारतीत उपहारगृहाच्या सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने निविदा प्रकिया राबविण्यात येत आहे.

२. या संस्थेतील मेस व उपहारगृह एकत्रितपणे ठरवून दिलेल्या वेळेनुसार किमान नफा या तत्वावर चालवायची आहे.

३. मेस (खानावळ) करीता वेळ खालीलप्रमाणे राहिल. सकाळी ९.०० ते सकाळी १०.१५ व सायंकाळी ८.०० ते ९.३० पर्यंत. उपहारगृहाकरीता वेळ पुढीलप्रमाणे राहील – सकाळी ७.०० ते ९.०० व सकाळी १०.३० ते सायंकाळी ७.३० पर्यंत.

४. निविदाकार महाराष्ट्र शासनाच्या रोजगार व **स्वंय रोजगार विभाग किंवा राज्य/केंद्र शासनाच्या** सेवा पुरवठादारांच्या नोंदणीसाठी प्राधिकृत संस्थेकडे नोंदणीकृत असला पाहिजे. तसेच निविदाधारकाजवळ महाराष्ट्र शासन यांचा अन्न व औषध प्रशासनाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे.

५. निविदाकार यांना यापुर्वी किमान २ वर्ष शासनाच्या किंवा शासनमान्य संस्थेस खानावळ/उपहारगृह सेवा पुरवण्याबाबतचा अनुभव असणे आवश्यक आहे.

६. मेस मधील जेवण/उपहारगृहातील खाद्यपदार्थ ताजे, रुचकर चांगल्या प्रतीचे व आरोग्यास हितकारक असणे आवश्यक आहे.

७. मेस/उपहारगृह मधील डायनींग टेबल सोडून उर्वरीत सर्व सामान (खुर्च्या, आर.ओ., वॉटर कुलर इ.) कंत्राटदाराने पुरवावयचे आहेत. सुरक्षाशुल्क रुपये १०,०००/– अनामत म्हणून बिनव्याजी रक्कम या कार्यालयात जमा करावी लागेल. कंत्राटाचा कालावधी संपताच सदर रक्कम तुटफुटीची भरपाई रक्कम वजा करुन परत करण्यात येईल.

८. मेस/उपहारगृह मधील सामानाची मोडतोड झाल्यास बल्ब तथा विजेचे साहित्य इ. खराब झाल्यास तसेच इतर काही किरकोळ दुरुस्ती असल्यास आपणास स्वःखर्चाने करावी लागेल.

९. निविदा भरण्यापुर्वी निविदाकाराने स्वतः प्रत्यक्ष या कार्यालयास भेट देऊन कामाची विस्तृत माहिती करुन घेऊन निविदा दाखल करावी.

१०. मेस/उपहारगृह मधील विज व पाणी वापरासह सुविधा शुल्क रु. १५०००/– (प्रतिमाह) राहील व ते प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेच्या आंत भरणे आवश्यक राहील.

११. मेस/उपहारगृह मधील वास्तुना महानगरपालिका कराबद्दल संचालक, तंत्रशिक्षण विभाग, मुंबई द्वारा प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर कडून कर भरण्याविषयी आदेश आल्यास व्यवस्थापक या नात्याने या वास्तुचा महानगरपालिका कर आपणांस भरावा लागेल, याची नोंद घ्यावी.

१२. कामावर बालमजूर लावता येणार नाही.

१३. मेस/उपहारगृह मध्ये कोणतेही नशिले पदार्थ व शासनाने वर्जीत केलेले पदार्थ ठेवता येणार नाहीत. तसे आढळल्यास कार्यवाही करण्यात येईल.

१४. विद्यार्थ्यांकडुन मेसचे प्रतिमाह शुल्क वसूल करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

१५. मेस/उपहारगृह मधील विद्यार्थी यांच्याशी कोणत्याही प्रकारचे भांडण अथवा मारामारी करु नये. काही अडचण वा तक्रार असल्यास मा.प्राचार्यांशी संपर्क साधावा.

१६. मेसमध्ये रोजच्या सकाळच्या जेवणात खालील बाबी असणे आवश्यक राहील.

जेवण तयार करतांना चांगल्या प्रतीचा गहू, तांदुळ व दाळ वापरण्यात यावी, दोन भाज्या (त्यापैकी एक हिरवी भाजी) , वरण, भात, पोळी, पापड, सलाद, ताक किंवा दही, लोणचे/चटणी. तसेच सायंकाळच्या

जेवणात दोन भाज्या, वरण साधे किंवा फोडणीचे, भात, पोळी, पापड, सलाद, लोणचे किंवा चटणी इ. व आठवडयात किमान दोनदा पनीरची भाजी देणे बंधनकारक राहील. या व्यतिरिक्त प्रत्येक बुधवारी एक स्विट डिश व प्रत्येक रविवारी एक फिस्ट (Feast) देणे आवश्यक आहे. तसेच उपहारगृहात पुरविण्यात येणारे पदार्थ विद्यार्थी समितीने ठरविलेल्या निवडीनुसार योग्य दर्जाचे सोबतच्या दरसुचीप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात यावे.

१७. मेसमधील जेवण तसेच उपहारगृहातील खाद्यपदार्थ तयार करण्याकरीता रिफाइन्ड तेल वापरण्यात यावे.

१८. सादर करावयाची निविदा दोन वेगवेगळ्या लिफाफ्यात संस्थेच्या कार्यालयात विहित मुदतीत जमा करण्यात याव्या. लिफाफा क्र.१ हा तांत्रिक निविदेकरीता राहील. तसेच लिफाफा क्र.२ हा वाणिज्यिक निविदेकरीता राहील.

१९. तांत्रिक निविदांच्या लिफाफयावर (क्र.१) ''तांत्रिक निविदा'' असे सुस्पष्ट उल्लेख करुन त्यामध्ये खालील कागदपत्रांना अनुक्रमे समावेश असणे आवश्यक आहे.

अ) संस्थेच्या लेटर हेडवर अथवा शिक्का असलेल्या कागदावर निविदाकाराची सही व शिक्का असलेले स्वत:ची किंवा संस्थेची माहिती असलेले विवरणपत्र (प्रपत्र क्र–१)

ब) संस्थेसंबंधी सेवापुरवण्यासाठी अधिकृत असल्याचे राज्य/केंद्र शासनाच्या आवश्यक विभागाचे नोंदणी प्रमाणपत्राची छायाप्रत तसेच शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाने वितरीत केलेला वैध परवान्याची छायाप्रत.

क) संस्थेच्या संचालकांची नावे, कार्यालयीन पत्ते व संपर्क क्रमांक यांचे विवरणपत्र

ड) निविदा सूचनेमध्ये नमुद केलेल्या सेवेची अनुभव प्रमाणपत्र

इ) संस्थेचे GST रजीस्ट्रेशन प्रमाणपत्र चालु वर्षात सेवा कर भरल्याचा पुरावा.

फ) मागील दोन आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र

ग) निविदा शुल्क रु.१०००/– भरल्याचा पुरावा प्रमाण IDBI बँकेत चालानद्वारे भरणा केल्याची पावती सोबत जोडावी.

ह) बयाणा रक्कम रुपये ५०००/–चा धनाकर्ष, Principal, Govt. College of Engg. Nagpur यांचे नावे व नागपूर येथे देय असलेला असावा.

ज) सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबचे हमीपत्र.

ल) या आधीच्या/सध्याच्या विविध प्रतिष्ठानास देत असलेल्या सेवा समाधानकारक असल्याबाबत प्रमाणपत्र

म) **प्रत्येक कागद पत्रांवर पान क्र. नमूद करण्यात यावा, तसेच एकूण पाने खालीलप्रमाणे स्वतंत्र कागदावर प्रमाणित करावे. ''प्रमाणित करण्यात येते की, मी सादर करीत असलेल्या निविदेसोबत एकूण .......... पाने तांत्रिक छाननी करीता जोडण्यात येत आहेत.''**

निविदा धारकाची सही

२०. वाणिज्यिक लिफाफ्यात (Commercial Envelop) सोबत जोडलेल्या वाणिज्यिक निविदा प्रपत्र क्र. २ व प्रपत्र क्र.३ संस्थेच्या लेटर हेडवर अथवा शिक्का असलेल्या कागदावर भरुन सही व शिक्क्यानिशी सिलबंद करण्यात यावा, तसेच लिफाफयावर (लिफाफा क्र. २)'वाणिज्यिक निविदा' असे सुस्पष्ट नमूद करावे.

२१.दोन्ही सिलबंद पाकीटे तिस–या मोठया पाकिटात टाकून ते सिलबंद करावे व त्यावर "प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, सेक्टर २७, मिहान पुनर्वसन वसाहत, खापरी, नागपूर–४४१ १०८" असा पत्ता लिहावा व पाकीटावर ''वसतीगृहाकरीता खानावळ सेवा पुरविण्यासाठी निविदा'' असा स्पष्ट उल्लेख करावा.

२२.तांत्रिक तपासणी योग्य असलेल्या निविदाधारक वाणिज्यिक निविदा उघडण्याकरीता पात्र असतील. वाणिज्यिक **निविदेमधील प्रपत्र क.२ मध्ये सर्वात कमी प्रतिमाह प्रतिव्यक्ती** नमूद केलेल्या निविदाधारकास खाणावळ सेवा पुरविण्याचे कंत्राट बहाल करण्यात येईल. **तसेच प्रपत्र क.३ मध्ये** नमूद केलेल्या दरसुचीप्रमाणे उपहारगृहातील पदार्थांचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. जेवणाच्या दर्जाबाबत तडजोड होण्याची शक्यता जाणवल्यास, न्यूनतम दर संस्थेस स्विकारणे बंधनकारक राहणार नाही.

२३.कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा तसेच निविदेसंबंधी इतर सर्व अधिकार 'प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर–४४१ १०८' यांना राहतील.

२४.खानावळ सेवापुरविण्याचे कंत्राट कार्यालयीन आदेशाचे दिनांकापासुन ०३ महिन्यासाठी असेल, सेवेचा दर्जा समाधानकारक आढळल्यास पुढील ०८ महिन्याकरीता कंत्राट सुरु ठेवण्याकरीता विचार करण्यात येईल. सेवेचा दर्जा व इतर बाबतीत तक्रारी प्राप्त झाल्यास १५ दिवसांची पुर्वसुचना देण्यात येवून कंत्राट रद्द करण्यात येईल व याचे अधिकार मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर यांना असतील.

२५.प्रत्येक निविदाकारास निविदा शुल्क रुपये १०००/– ची ना–परतावा रक्कम चालान पावती, तांत्रिक निविदेच्या पाकिटासोबत जोडावी लागेल. निविदा शुल्क रोख अथवा धनाकर्षद्वारे कार्यालयात स्विकारले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

२६.प्रत्येक निविदाकारास तांत्रिक निविदेच्या पाकीटासोबत बयाणा रक्कम म्हणून रुपये ५,०००/– (पाच हजार रुपये) चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष Principal, Govt. College of Engg. Nagpur यांचे नावे व नागपूर येथे देय असलेला जोडावा लागेल. वाणिज्यिक निविदा उघडल्यानंतर न्युनतम दराच्या निविदाकारा व्यतीरिक्त इतर सर्वांचे धनाकर्ष त्याचवेळी परत देण्यात येईल. न्युनतम दरधारकाची बयाणा रक्कम त्यांनी पुरवठा आदेशाचा स्विकार केल्यानंतर व सुरक्षा रक्कम/करारपत्र सादर केल्यानंतर बयाणा रक्कम परत करण्यात येईल. ज्या निविदाधारकास सेवापुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील. **त्याने कामास नकार दिल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.**

२७.खानावळ सेवापुरवठादारास राज्य/केंद्र शासनाच्या किमान वेतन कायद्यासह इतर सर्व कामगार कायद्यांचे पालन करणे बंधनकारक असेल. कायद्यांचे पालन करण्यात कुचराई होत असल्याचे लक्षात आल्यास सेवापुरवठाचे कंत्राट तात्काळ रद्द करण्यात येईल व कायदा उल्लघंनासंदर्भातील कायदेशीर कार्यवाहीस सेवापुरवठादार जबाबदार राहील.

२८.निवड झालेल्या सेवापुरवठादारातर्फे काम करणा–या मनुष्यबळास ओळखपत्र व ड्रेस कोडमध्ये संस्थेत उपस्थित राहणे आवश्यक आहे. सदर ओळखपत्र व ड्रेस कोड सेवापुरवठादाराने द्यावयाचे आहे.

२९.खानावळ/उपहारगृह सेवापुरवठादाराने सेवा पुरविण्यासाठी नियुक्त केलेल्या मनुष्यबळाने कोणत्याही प्रकारचे धुम्रपान, नशापाणी, तंबाखु, गुटखा अथवा तत्सम पदार्थाचे सेवन करणार नाही. याअनुषंगाने उद्भवणा–या सर्व घटनास/परिणामांस सेवापुरवठादार हे संपुर्णत: जबाबदार राहतील.

३०.सेवा कंत्राट रक्कमेबाबतचा सेवाकर, आयकर व इतर सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करणे सेवापुरवठादाराला आवश्यक राहील व याची संपुर्ण जबाबदारी सेवापुरवठादाराची राहील.

३१. सेवापुरवठादाराने पुरविलेल्या मनुष्यबळाच्या कायदेशीर रक्कमा (उदा.किमान वेतन,पी.एफ.,विमा इ.) कामगारास नियमाप्रमाणे अदा करण्याची जबाबदारी संपूर्णत: सेवापुरवठादाराची राहील.

३२. सेवे दरम्यान नियुक्त मनुष्यबळाने शासकीय मालमत्तेची काळजी घेणे आवश्यक असून शासकीय नुकसान झाल्यास त्याची भरपाई सेवापुरवठादाराकडुन करण्यात येईल.

३३. खानावळ/उपहारगृह सेवापुरवठादाराने नियुक्त केलेल्या मनुष्यबळाने कार्यालय परिसरात सुरक्षेच्या आवश्यक नियमांचे पालन करावे तथापि काम करतांना काही अपघात इ.झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

३४. खानावळ/उपहारगृह सेवा पुरवठादाराला सेवा घेणाऱ्या व्यक्तिचे (विद्यार्थी/विद्यार्थिनी) प्रतिमाह देय रक्कम विहित मार्गाने वसूल करण्याचा अधिकार राहील. भविष्यात काही आर्थिक बाबी निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच या कार्यालयाकडे कंत्राटदाराने नेमलेल्या कामावरील कोणत्याही व्यक्तीस वैयक्तिक स्वरुपाचे वेतन व अन्य सवलती संदर्भात मागणी करता येणार नाही.

३५. खानावळ/उपहारगृह सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदारातर्फे काम करणाऱ्या कुठल्याही व्यक्तीला खानावळीकरीता वापरण्यात येणाऱ्या अथवा संस्था परिसरात कुठल्याही जागी रात्रीचे वेळी थांबता येणार नाही, अथवा निवास करता येणार नाही.

३६. निवड झालेल्या सेवापुरवठादारास रुपये १००/-च्या बॉन्ड पेपरवर (दस्तऐवज) वरीलप्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा नोंदणीकृत नोटरी यांचेकडून करुन घेवून सादर करणे आवश्यक राहील.

(प्रा. डॉ. एम. बी. कुमठेकर)
प्र. प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
नागपूर

प्रपत्र–१

# तांत्रिक निविदा विवरण पत्र

(संस्थेच्या लेटरहेडवर अथवा शिक्का असलेल्या कोऱ्या कागदावर)

१) कंत्राटदाराच्या संस्थेचे नांव व संपूर्ण कार्यालयीन पत्ता:–

२) संस्थेचा नोंदणी क्रमांक व नोंदणीकृत पत्ता:–
(नोंदणी प्रमाणपत्राची छायाप्रत जोडावी)

३) ज्या प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली आहे त्याचा संपूर्ण पत्ता:–

४) अन्न व औषध प्रशासनाचा वैध परवाना क्र. :–

५) निविदाधारक/संस्था चालकाचे नाव, पत्ता, दुरध्वनी,भ्रमणध्वनी क्र.व ई–मेल पत्ता:–

६) अनुभवाचा तपशिल(आवश्यक प्रमाणपत्रे जोडावीत):– वर्ष महिने

७) निविदाधारक/संचालकाचे ओळखपत्राचा तपशिल:–

८) **अट क्र.१९ अ ते म प्रमाणे** (आवश्यक प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती):– एकूण .......... पेपर्स

९) आवेदन शुल्क रुपये १०००/– भरल्याचा पुरावा:– चालान पावती क्र. ..........
( चालान पावती )

१०) बयाणा रक्कम रुपये ५०००/–चा धनाकर्ष:– डीडी क्र........
(प्राचार्य,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर
यांचे नावे,नागपूर येथे देय असलेला)

मी/आम्ही खालील सही करणार, असे शपथपूर्वक प्रमाणित करतो की, वर नमूद करण्यात आलेली माहिती खरी असून, खोटी आढळल्यास होणा–या परिणामांची जबाबदारी माझी राहील. तसेच सदर कंत्राटासाठी आपण नमूद केलेल्या सर्व अटी मला मान्य आहेत.

स्थळ:– ( सही )

दिनांक:– (पूर्ण नांव व शिक्का)

प्रपत्र क्र.२

# वाणिज्यिक निविदा विवरण पत्र

१. सेवापुरवठादाराच्या संस्थेचे नाव:—

२. कामाचे वर्णन :— कंत्राटी तत्वावर विद्यार्थी/विद्यार्थिनी वसतीगृहाकरीता खानावळ सेवा पुरविणे.

| अ. क्र. | खानावळ सेवेचे स्वरुप | प्रतिमाह, प्रति व्यक्ती करीता आकारण्यात येणारा दर रुपये (सर्व प्रकारचे कर आकारुन) |
|---|---|---|
| १ | **अट क्र. १६ प्रमाणे.** सकाळच्या जेवणात दोन भाज्या (त्यापैकी एक हिरवी भाजी) , वरण, भात, पोळी, पापड, सलाद, ताक किंवा दही, लोणचे/चटणी. तसेच सायंकाळच्या जेवणात दोन भाज्या, वरण साधे किंवा फोडणीचे, भात, पोळी, पापड, सलाद, लोणचे किंवा चटणी इ. व आठवडयात किमान दोनदा पनीरची भाजी देणे बंधनकारक राहील. या व्यतिरिक्त प्रत्येक बुधवारी एक स्विट डिश व प्रत्येक रविवारी एक फिस्ट (Feast) देणे आवश्यक आहे. जेवण तयार करण्याकरीता रिफाइन्ड तेल वापरण्यात यावे. | |

स्थळ:—

( सही )

दिनांक:—

(पूर्ण नांव व शिक्का)

प्रपत्र क्र. ३

बाणिज्यिक निविदा विवरणपत्र (उपहारगृह सेवा)

उपहारगृहातील खाद्य पदार्थांचे दरपत्रक

| अ.क्र. | खाद्यपदार्थांचे नांव | हाफ | फुल |
|---|---|---|---|
| १ | दुध | ६ रु | १२/— रु |
| २ | चहा | ५ रु | १०/— रु |
| ३ | काफी | ६ रु | १२/— रु |
| ४ | समोसा | — | २०/— रु |
| ५ | कचोरी | — | २०/— रु |
| ६ | संबारवडी | — | २०/— रु |
| ७ | पोहा | — | १५/— रु |
| ८ | उपमा | — | १५/— रु |
| ९ | फराळी चिवडा | — | २०/— रु |
| १० | फरसाण | — | १५/— रु |
| ११ | भेल | — | १५/— रु |
| १२ | मॅगी | — | १५/— रु |
| १३ | वडा सांभार | — | २०/— रु |
| १४ | इडली वडा | — | २०/— रु |
| १५ | पालक वडा | — | २०/— रु |
| १६ | मिसळ | — | १५/— रु |
| १७ | साबुदाना वडा | — | २०/— रु |
| १८ | साबुदाना उसळ | — | २०/— रु |
| १९ | दोसा/उत्तपम | — | २०/— रु |

वरील दराने मी पुरवठा करण्यास तयार आहे.

आवेदन पत्र भरणा—याचे सही व नाव

Bank Copy

## GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING, NAGPUR

Sector 27, Mihan Rehabilitation Colony, New Khapri, Nagpur, Maharashtra 441108
(07103) 202012 E-mail-principal.gcoen@gmail.com

IDBI BANK Wardha Road Branch, Nagpur (SOL - 1047)
0712-6468024/25/26/27/28/29

Fees Paid to current A/C No - 1047102000003315

Year 2017-2018 Date - ______

Name of Company ______

Add. ______

Department ______

GST No. ______

Mobile No ______

| Sr. No | Particulars | Amount | |
|---|---|---|---|
| 1 | Tender Processing Fee | 1000 | |
| 2 | Deposit Amount | | |
| 3 | Others | | |
| 4 | | | |
| 5 | | | |
| 6 | | | |
| 7 | | | |
| 8 | | | |
| | Total | | |

Rupees in words ______

| Denominations | No of Notes | Total |
|---|---|---|
| | | |
| Total | | |

DD No ______ Dated ______ Drawn on ______

Amount ______

Note: Fees can be deposited in any branch of IDBI BANK LTD

Signature of Depositor

College Copy


## GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING, NAGPUR

Sector 27, Mihan Rehabilitation Colony, New Khapri, Nagpur, Maharashtra 441108
(07103) 202012 E-mail-principal.gcoen@gmail.com

IDBI BANK Wardha Road Branch, Nagpur (SOL - 1047)
0712-6468024/25/26/27/28/29

Fees Paid to current A/C No - 1047102000003315

Year 2017-2018 Date - ______

Name of Company ______

Add. ______

Dipartment ______

GST No. ______

Mobile No ______

| Sr. No | Particulars | Amount | |
|---|---|---|---|
| 1 | Tender Processing Fee | 1000 | |
| 2 | Deposit Amount | | |
| 3 | Others | | |
| 4 | | | |
| 5 | | | |
| 6 | | | |
| 7 | | | |
| 8 | | | |
| | Total | | |

Rupees in words ______

| Denominations | No of Notes | Total |
|---|---|---|
| | | |
| Total | | |

DD No ______ Dated ______ Drawn on ______

Amount ______

Note: Fees can be deposited in any branch of IDBI BANK LTD

Signature of Depositor


Vender Copy


## GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING, NAGPUR

Sector 27, Mihan Rehabilitation Colony, New Khapri, Nagpur, Maharashtra 441108
(07103) 202012 E-mail-principal.gcoen@gmail.com

IDBI BANK Wardha Road Branch, Nagpur (SOL - 1047)
0712-6468024/25/26/27/28/29

Fees Paid to current A/C No - 1047102000003315

Year 2017-2018 Date - ______

Name of Company ______

Add. ______

Dipartment ______

GST No. ______

Mobile No ______

| Sr. No | Particulars | Amount | |
|---|---|---|---|
| 1 | Tender Processing Fee | 1000 | |
| 2 | Deposit Amount | | |
| 3 | Others | | |
| 4 | | | |
| 5 | | | |
| 6 | | | |
| 7 | | | |
| 8 | | | |
| | Total | | |

Rupees in words ______

| Denominations | No of Notes | Total |
|---|---|---|
| | | |
| Total | | |

DD No ______ Dated ______ Drawn on ______

Amount ______

Note: Fees can be deposited in any branch of IDBI BANK LTD

Signature of Depositor